**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २४९** **दिनांक :- ०९/०९/२०२१**

## घरफोडी करणा-या आरोपीतास अटक करुन १३ गुन्हे ऊघडकीस व ४,३४,९००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यास विरार पोलीसांना यश.

दिनांक १८/०६/२०२१ रोजी ०९:३० वा. ते दिनांक. २०/०६/२०२१ रोजीचे सकाळी ०५:०० वाजताचे दरम्यान अज्ञात चोरट्यांने १०२, ब्रम्हा अपार्टमेंट (फिर्यादी यांचा राहता फ्लॅट) ची कडी कोयंडा ऊचकटून बेडरुमच्या ड्रेसिंग टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५२८/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हयाचे घटनास्थळावरील प्राप्त तांत्रिक पुरावे, आरोपीची गुन्हा करण्याची कार्यपध्दती आणि बातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीला कारगील नगरमधून ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे.

यातील अटक आरोपी हा स्क्रु ड्रायव्हरच्या सहाय्याने बंद घर/फ्लॅट, शटरचे कडी कोयंडा ऊचकटून त्यामध्ये असलेली रोख रक्कम, सोने चांदीचे दागीणे आणि वस्तुंची चोरी करित असतो. त्याकरीता दिवसाच्या वेळी परीसरामध्ये फिरुन रेकी करणे आणि रात्रीच्या वेळी चोरी करणे अशी त्याची गुन्हा करण्याची पध्दत आहे. आरोपी नामे श्रीपत नारायण शिगवण, वय ३८ वर्षे, रा. ११० (भाडेतत्वावर), बिल्डींग क्र. ०२, साईबाबा संकुल, कारगील नगर, विरार (पू.), मुळ राहणार ००३, जय सेवालाल अपार्टमेंट, कारगील नगर, विरार (पू.) यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून तपासामध्ये त्याचेकडून १२२.५०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने, ३० ग्रॅम वजनाचे चांदिचे दागीने व इतर असा एकुण ४,३४,९००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच त्याने खालीलप्रमाणे एकुण १३ गुन्हे केल्याची तपासामध्ये माहिती दिली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ८०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | २. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २५१/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
| ३. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. २५७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | ४. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ४२८/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३८० |
| ५. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ५२८/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | ६. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ५९५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
| ७. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६०२/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ | ८. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६९५/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
| ९. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६९९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | १०. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७०७/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
| ११. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७१९/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० | १२. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ७६०/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |

| १३. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६३६/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० |
|---|---|

सदरची कामगीरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ व श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रफुल्ल वाघ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. विजय दुबळा, दिलीप बरफ, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, पवन पवार आणि राहुल घोलप यांनी केली आहे.

*********